महाराष्ट्र शासन

**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**

**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

क्र. पोमसं /३६/ र.व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२६, मुंबई, दि. ई-स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ** :- महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-११२५/ प्र.क्र.४१०/ विशा-३(अ), दि. २९/०७/२०२६.

**विषय** :- अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स (ANTF) मधील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांना सातव्या वेतन आयोगानुसार मूळ वेतनाच्या ३० टक्के प्रोत्साहन भत्ता मंजूर करण्याबाबत.

*****

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-११२५/ प्र.क्र.४१०/ विशा-३(अ), दि. २९/०७/२०२६ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०७२९११४५३७६७२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
Chandrashekhar Govindrao Shinde
Date: 01-08-2026 13:37:41

( चंद्रशेखर शिंदे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व का.) (अति.कार्य.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (लेखा),
कार्यासन अधिकारी, का.क्र. ३०.

प्रत,

अपर पोलीस महासंचालक, प्रशासन, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक प्रशासन, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके “लेखा" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स (ANTF) मधील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांना सातव्या वेतन आयोगानुसार मूळ वेतनाच्या ३० टक्के प्रोत्साहन भत्ता मंजूर करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-११२५/प्र.क्र.४१०/विशा-३(अ)**
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक: २९ जुलै, २०२६

**संदर्भ :-**

१. गृह विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-१०२२/प्र.क्र.१५३/विशा-३(अ), दि. ३१.०८.२०२३

२. गृह विभाग, शासन निर्णय क्र. एपिओ-३१२३/प्र.क्र.८२/पोल-३, दि. १९.०३.२०२५

३. उपसहायक (लेखा), पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र, दि.०९.०३.२०२६

**प्रस्तावना :-**

राज्यात अंमली पदार्थाचे उत्पादन, वितरण, विक्री व अवैद्य वापरात वाढ झाली आहे. अंमली पदार्थाचा दुरुपयोग राज्याच्या प्रगतीशील आणि गतिमान अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम करत असून अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या राज्यातील तरुणांच्या सामाजिक, आर्थिक, मानसिक व शारीरिक आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहेत. अंमली पदार्थ विरोधी कडक प्रतिबंधात्मक कारवाई करण्यासाठी राज्यात अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स (Anti Narcotics Task Force) स्थापन करण्यास संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये मान्यता दिली आहे. तसेच, अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स कार्यालयाकरीता एकूण ३४६ नवीन पदे निर्माण करण्यास व त्यानुषंगाने येणाऱ्या आवर्ती व अनावर्ती खर्चास उपरोक्त संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता दिली आहे.

अवैध अंमली पदार्थ वापराच्या वाढत्या समस्या व त्यास आळा घालण्यासाठी केंद्र शासन व महाराष्ट्र शासनाने अंमली पदार्थाच्या गैरवापर आणि अवैध तस्करीविरुद्ध “शून्य सहनशीलता धोरण” (Zero Tolerance Policy) स्वीकारले आहे.

त्यानुषंगाने, राज्यात अवैध अंमली पदार्थाच्या तस्करीशी संबंधीत गुन्ह्यांमध्ये व आंतरराष्ट्रीय/ संघटीत गुन्हेगारी टोळ्यांविरुद्ध स्वतःचा जीव धोक्यात घालून सतत गुप्त कारवाया, छापे टाकणे, तपास करण्याचे कार्य अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्समधील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार करीत असतात. तसेच घातक अंमली पदार्थाच्या हाताळणीमुळे सदर अधिकारी/ पोलीस अंमलदार यांना गंभीर शारीरिक व मानसिक दुखापत होण्याची शक्यता असते.

त्यानुषंगाने राज्यातील कार्यक्षम पोलीस अधिकारी व अंमलदार यांना अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्सकडे (ANTF) आकर्षित करून घेण्यासाठी तसेच अवैध अंमली पदार्थाच्या तस्करीशी संबंधित कामाचे स्वरूप व जोखीम विचारात घेवून, त्यांना सातव्या वेतन आयोगानुसार मिळणाऱ्या वेतनश्रेणीतील मूळ वेतनाच्या ३० टक्के इतकी रक्कम प्रोत्साहन भत्ता मंजूर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय :-</u>**

महाराष्ट्र राज्यात अवैध अंमली पदार्थांच्या तस्करीस आळा घालण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स (ANTF) मधील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांच्या कामाचे स्वरूप व जोखीम विचारात घेता, अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स (ANTF) मधील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांना सातव्या वेतन आयोगानुसार मिळणाऱ्या वेतनश्रेणीतील मूळ वेतनाच्या ३० टक्के इतकी रक्कम “प्रोत्साहन भत्ता” म्हणून मंजूर करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. या प्रोत्साहन रकमेवर कोणतेही भत्ते अनुज्ञेय राहणार नाही. अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स (ANTF) मधील कार्यरत पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार मुळ घटकात परत गेल्यास त्यांना हा प्रोत्साहन भत्ता देय होणार नाही.

३. सदर प्रोत्साहन भत्ता दि.०१.०८.२०२६ पासून अनुज्ञेय राहील.

४. यावर होणारा वार्षिक सरासरी आवर्ती खर्च अंदाजे रु. ५,९०,५०,५००/- (रुपये पाच कोटी नव्वद लाख पन्नास हजार पाचशे फक्त) इतका असून, सदर प्रोत्साहन भत्यापोटी येणार खर्च

संबंधित पदाचे वेतन व भत्ते ज्या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात येतात त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकून मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०७२९११४५३७६७२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

YAMUNA DHANANJAY JADHAV

Digitally signed by YAMUNA DHANANJAY JADHAV
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Home Department, 2.5.4.20=2C3DF382DDA9F94D60DC0EA9D4827D801C6EDC144E58FFD58ED3EF2FE7FB16A5, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F6CCE4E8E68DFB65BCD1BA4CE35CF82E2B05A7DDC3056B9285E5C75F146B1EEA, cn=YAMUNA DHANANJAY JADHAV
Date: 2026.07.29 11:49:18 +05'30'

**( यमुना जाधव )**
**उप सचिव,महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय,मुंबई.

२. मा.राज्यमंत्री (गृह) शहरे /ग्रामीण, महाराष्ट्र शासन, मंत्रालय,मुंबई.

३. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय,मुंबई.

४. अपर मुख्य सचिव,गृह विभाग, मंत्रालय,मुंबई.

५. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य,मुंबई.

६. विशेष पोलीस महानिरीक्षक, अंमली पदार्थ विरोधी टास्क फार्स,म.रा. मुंबई.

७. निवडनस्ती/ विशा-३(अ),गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.